ePaper
# एकनाथ शिंदेंच्या घराबाहेर लागले बॅनर्स; चर्चांना उधाण

|| वर्ष - 8 | अंक -144 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 02 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- गोलंदाजीच्या जोरावर भारताने मारली बाजी
- रोहित शर्माच्या मुलाचे काय ठेवले नाव?
- ९ देशांना डोनाल्ड ट्रम्पनी दरडावले
- बांगलादेशमधील हिंदूंसाठी RSS मैदानात


### महाविकास आघाडीकडून निवडणूक प्रक्रियेवर संशय

# निवडणूक संपली पण लढाई नाही!

## युगेंद्र पवारांकडून मत पडताळणीसाठी अर्ज दाखल

| बारामती | महाईन्यूज

**बारामती विधानसभा मतदारसंघात काका विरुद्ध पुतण्या अशी लढत झाली. या लढतीत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. त्यांच्या विरोधात उभे असलेले त्यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांचा पराभव झाला आहे. महायुतीला जनतेकडून मिळालेला कौल आणि महाविकास आघाडीचा झालेल्या दारूण पराभवानंतर महाविकास आघाडीकडून निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त केला जात आहे.**



**युगेंद्र पवारांकडून मत पडताळणीसाठी अर्ज दाखल**

याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात उभे ठाकलेले त्यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार यांचा पराभव झाल्यानंतर त्यांनी मत पडताळणीसाठी अर्ज दाखल केला आहे.

**युगेंद्र पवार यांचा आभार दौरा**

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी आजपासून बारामती तालुक्यात आभार दौरा सुरू केला आहे. या आभार दौऱ्यादरम्यान बोलताना युगेंद्र पवार म्हणाले की, महाराष्ट्रभर संशयाचे, संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. बारामती पुरतेच मर्यादित असतं तर एक वेगळी गोष्ट होती.

**पारंपारिक मतदारसंघात इतकं काम करुनही दिग्गज नेत्यांचा पराभव कसा झाला?**

परंतु राज्यातील जे मोठे मोठे दिग्गज आहेत. ते कधीही न हरणारे नेते आहेत. त्यांचा तिथे पराभव झाला आहे. पारंपारिक मतदार संघात एवढे काम करूनही ते निवडून आले नाहीत. हे का झालं..? न्यायालयाने आम्हाला जो अधिकार दिला आहे की, मतदारसंघातील पाच टक्के बूथ फेर तपासणी करू शकतो. तर त्या अधिकाराचा आम्ही उपयोग का करू नये, असं युगेंद्र पवार यावेळी म्हणाले.

**आम्ही लोकांपर्यंत जाऊ - युगेंद्र पवार**

पाच वर्षांनी पुन्हा विधानसभा येईल. एवढं बहुमत त्यांना मिळालं आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात एवढं बहुमत कोणाला मिळालं नव्हतं तेवढं आता महायुतीला मिळाले आहे. कारखाने, पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुकीत आम्ही लोकांपर्यंत जाऊ असेही यावेळी ते म्हणाले.

### ईव्हीएम मशीन पडताळणीसाठी राहुल कलाटेंचा अर्ज

## चिंचवडमधून शंकर जगताप हे एक लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी

| चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील शरद पवार गटाचे राहुल कलाटे यांनी ईव्हीएम मशीन पडताळणीसाठी अर्ज केला आहे. चिंचवड मधून आमदार शंकर जगताप विरुद्ध महाविकास आघाडीचे राहुल कलाटे असा सामना रंगला होता. चिंचवडमधून जगताप हे एक लाखांपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी झाले होते. यावर आक्षेप घेत राहुल कलाटे यांनी ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केला आहे.**



राहुल कलाटे यांनी काही मुद्दे मांडले आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक होत असताना अवघ्या महाराष्ट्रात निवडणूक होत होती. चिंचवड विधानसभा मतदारसंघात राज्यातील विविध ठिकाणी राहणाऱ्या मतदारांची संख्या जास्त आहे. चिंचवड मधील हजारो मतदार हे त्यांच्या मूळ गावी मतदानासाठी गेले तरी देखील चिंचवड मध्ये मतदानाचा टक्का वाढला कसा? असा प्रश्न राहुल कलाटे यांनी उपस्थित करत आक्षेप घेतला असून ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केला आहे.

**निवडणूक आयोगाकडून उत्तर नाही**

एक बूथ साठी जीएसटीसह तब्बल ४७ हजार २०० रुपये मोजले आहेत. अशी एकूण २५ बूथसाठी ११ लाख ८० हजार रुपये त्यांनी भरले आहेत. अशी माहिती राहुल कलाटे यांनी दिली आहे. अर्ज करून राहुल कलाटे यांना तीन – चार दिवस झाले असले तरी अद्याप तरी निवडणूक आयोग कडून त्यांना उत्तर मिळालेलं नाही. ४५ दिवसात उत्तर मिळणं अपेक्षित असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे ते निवडणूक आयोगाच्या उत्तराची प्रतीक्षा करत आहेत.

# जंतनाशक मोहिमेतून पुण्याला वगळलं!

## 4 डिसेंबरपासून जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य सरकारकडून येत्या ४ डिसेंबरपासून जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम राज्यभरात राबविण्यात येणार असली, तरी त्यातून पुणे शहर वगळण्यात आले आहे. कारण राज्य सरकारकडून पुणे महापालिकेला जंतनाशक गोळ्यांचा पुरवठाच झाला नसल्याचे समोर आले आहे.**




मोहीम अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्याचा आदेश राज्य सरकारने पुणे महापालिकेला दिला आहे.राज्य सरकारकडून राष्ट्रीय जंतनाशक दिनापासून म्हणजेच ४ डिसेंबरपासून ही मोहीम १६ आदिवासी जिल्हे आणि १९ महापालिकांमध्ये राबविण्यात येणार आहे. ही मोहीम १० डिसेंबरपर्यंत राबविण्यात येईल. या मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शाळा आणि अंगणवाडी केंद्रावर अल्बेनडेझोल या जंतनाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत. या मोहिमेसाठी गोळ्यांचा पुरवठा राज्य सरकारकडून केला जातो. या वेळी जिल्हा आरोग्य विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा झाला. मात्र, पुणे महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा करण्याआधी त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल सरकारला मिळाला. त्यामुळे महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा झाला नाही.याबाबत महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे म्हणाले, की राज्य सरकारकडून गोळ्यांचा पुरवठा होणार होता. मात्र, त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल आल्याने पुरवठा होऊ शकला नाही. राज्य सरकारकडून पुरवठा झाल्यानंतर जंतनाशक मोहीम राबविली जाईल. ही मोहीम ४ डिसेंबरपासून सुरू होणार नसली, तरी आमच्याकडे सध्या महापालिकेच्या दवाखान्यात येणाऱ्या मुलांना देण्यासाठी जंतनाशक गोळ्यांचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी गोळ्यांची टंचाई नाही. गोळ्यांची आवश्यकता किती?राज्य सरकारकडून वेळेत जंतनाशक गोळ्यांचा पुरवठा न झाल्याने जंतनाशक मोहीम पुढे ढकलण्यात आली आहे. ही मोहीम राबविण्याची पुढील तारीख राज्य सरकारच्या आदेशानुसार निश्चित केली जाईल. डॉ. नीना बोराडे,

> पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी राज्य सरकारकडून गोळ्यांचा पुरेसा पुरवठा झाला आहे. आमच्याकडे बुलडाण्यावरून गोळ्या पाठविण्यात आल्या आहेत. जंतनाशक मोहीम राबविण्याचे प्रशिक्षण अंगणवाडीसेविका आणि आशासेविकांना देण्यात आले आहे.
>
> **-डॉ. नागनाथ येमपल्ले,** जिल्हा शल्यचिकित्सक

आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका. ही मोहीम १० डिसेंबरपर्यंत राबविण्यात येईल. या मोहिमेंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना शाळा आणि अंगणवाडी केंद्रावर अल्बेनडेझोल या जंतनाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत. या मोहिमेसाठी गोळ्यांचा पुरवठा राज्य सरकारकडून केला जातो. या वेळी जिल्हा आरोग्य विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा झाला. मात्र, पुणे महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा करण्याआधी त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल सरकारला मिळाला. त्यामुळे महापालिकेला गोळ्यांचा पुरवठा झाला नाही. याबाबत महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे म्हणाले, की राज्य सरकारकडून गोळ्यांचा पुरवठा होणार होता. मात्र, त्या गोळ्या खराब असल्याचा तपासणी अहवाल आल्याने पुरवठा होऊ शकला नाही. राज्य सरकारकडून पुरवठा झाल्यानंतर जंतनाशक मोहीम राबविली जाईल. ही मोहीम ४ डिसेंबरपासून सुरू होणार नसली, तरी आमच्याकडे सध्या महापालिकेच्या दवाखान्यात येणाऱ्या मुलांना देण्यासाठी जंतनाशक गोळ्यांचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी गोळ्यांची टंचाई नाही.राज्य सरकारकडून येत्या ४ डिसेंबरपासून जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम राज्यभरात राबविण्यात येणार असली, तरी त्यातून पुणे शहर वगळण्यात आले आहे. कारण राज्य सरकारकडून पुणे महापालिकेला जंतनाशक गोळ्यांचा पुरवठाच झाला.

# निवडणुकीसाठीच लाडकी बहीण योजना सुरू

## लाडकी बहिण योजनेबाबत अजित पवारचे मोठे वक्तव्य

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीने मोठे यश मिळविले. पाच महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातून फारसे यश न मिळालेल्या महायुतीच्या नेत्यांनी विधानसभेसाठी आवश्यक ती काळजी घेत नियोजनबद्ध पद्धतीने प्रचार केल्याने विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला यश मिळाले.**



### ईव्हीएममुळे पराभव सिद्ध करून दाखवा

विधानसभा निवडणुकीसाठीच लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली अशी जाहीर कबुली अजित पवार यांनी दिली आहे. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन केले. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी अजित पवार यांनी आढाव यांची भेट घेतली. अजित पवार म्हणाले, पाच महिन्यांपूर्वी लोकसभेला आमचा पराभव झाला. त्यानंतर आम्ही सर्वजण बसलो आणि योजना आणली. सगळ्या राज्यांनी काही ना काही योजना आणल्या. कोणी पाणी, वीज मोफत दिली; तर कोणी प्रवास मोफत दिला. महिलांना मदत दिली, तर बिघडले कुठे? इतर राज्यांनी दिले.

या निवडणुकीत २८८ जागांपैकी ५० जागाही काँग्रेस, शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष या महाविकास आघाडीला जिंकता आल्या नाहीत.विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुती सरकारने सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, हिंदुत्वाचा मुद्दा, याबरोबरच इतर योजनांमुळे महायुतीला हे यश मिळाले असल्याची टीका केली जात होती. राज्य सरकारची तिजोरी रिकामी करून केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या योजना राबविण्यात येत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात होता. निवडणुका झाल्यानंतर या योजनेचे नियम बदलले जातील आणि हळूहळू या योजना बंद होतील, अशी भीतीही व्यक्त केली जात होती. निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना आम्ही दाखवण्यासाठी सरकारी तिजोरीतून योजनांच्या नावाखाली निधीची लूट सत्तेत असलेले राज्यकर्ते करत असल्याचे बोलले जात होते. निवडणुकीच्या काळात महायुतीने लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० रुपयावरून २१०० रुपये करण्याची घोषणा देखील केली होती. निवडणुकीत यश मिळाल्यानंतर ही रक्कम पुढील काही महिन्यात वाढवून दिली जाईल, अशी हमी राज्याची काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात मागचे कारण स्पष्ट केले आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे धोरण

# उद्योगनगरीतील रस्ते होताहेत स्मार्ट!

## » नागरिकांच्या सुरक्षेसाठी रचनेत बदल, सौंदर्यात भर

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेपाठोपाठ महापालिकेच्या शहरी पथ धोरणांतर्गत (अर्बन स्ट्रीट गाइड लाइन्स) शहरातील रस्ते विकसित केले जात आहेत. त्यामध्ये मुख्य मार्ग, सेवा रस्ता, वाहनतळ, सायकल ट्रॅक, पदपथ असे नियोजन आहे. बहुतांश रस्त्यांची कामे झाली असून, काही कामे अद्याप सुरू आहेत. त्यामुळे त्यांचा कायापालट होताना दिसत आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरातील लोकसंख्या पर्यायाने वाहनांची संख्या वाढत आहे. परिणामी सर्वच रस्त्यांवर रहदारी वाढत असून, रस्ते मोठे असूनही वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. पार्किंगचा प्रश्नही गंभीर होत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून महापालिकेने अर्बन स्ट्रीट गाइड लाइन्सनुसार विविध रस्ते विकसित करण्यावर भर दिला आहे. यामध्ये सार्वजनिक वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते, पादचारी मार्ग, सायकलस्वारांसाठी सायकल मार्ग, दुचाकीसह सर्व प्रकारच्या वाहनांसाठी वाहनतळ, आकर्षक पथदिवे, या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. नागरिक व लहान मुलांसाठी शहरात ठिकठिकाणी सायकल ट्रॅक उभारण्यात येत आहेत. पादचारी मार्गही प्रशस्त बनवून आकर्षक केले जात आहेत.



### स्मार्ट रस्त्यांचा फायदा

» घरापासून जवळच्या ठिकाणी कामानिमित्त नागरिकांना सुरक्षितपणे चालत जाणे शक्य होईल.

» चालत जाण्यामुळे व्यायाम होऊन नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहू शकते

» वाहनांचा वापर कमी होऊन इंधनाची बचत होईल, शिवाय, ध्वनी व वायू प्रदूषण कमी होईल.

### रस्त्यांबाबत काही आक्षेप

» काही रस्ते खूपच रुंद व छोटे झाले असून, पदपथ तुलनेने अधिक रुंद केले आहेत

» विकसित केलेल्या रस्त्यांवर टपऱ्या, हातगाडीवाले, पथारी व्यावसायिकांचे अतिक्रमण

» काही व्यावसायिकांनी पदपथ व सायकल ट्रॅकवर अतिक्रमण करून 'पार्किंग' केली जाते

### सुरू असलेली कामे

» मुंबई-पुणे महामार्ग मोरवाडी चौक ते चिंचवड स्टेशन

» मोशी उपबाजार ते राजमाता जिजाऊ चौक जाधववाडी

### 'एलिव्हेटेड'मुळे स्मार्टपणा वाढेल

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित येणाऱ्या दोन महामार्ग आणखी स्मार्ट होणार आहेत. यामध्ये मुंबई-बंगळरू महामार्ग आणि पुणे-नाशिक महामार्गाचा समावेश आहे. बंगळरू महामार्गावरील देहूरोड ते कात्रज बाह्यवळण रस्त्यावरील देहूरोड ते बालेवाडी दरम्यान सुमारे साडेआठ किलोमीटर लांबीचा एलिव्हेटेड मार्ग (उड्डाणपूल) असेल. तसेच, नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा (कासारवाडी ते राजगुरुनगर) या दरम्यानचा मार्गही एलिव्हेटेड केला जाणार आहे. दोन्ही मार्ग मंजूर असून निविदा प्रक्रियेच्या टप्प्यावर आहेत. हे दोन्ही मार्ग झाल्यास अनुक्रमे किवळे, रावेत, पुनावळे, वाकड आणि भोसरी, मोशी, चाकण भागातील वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल.

“ नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करून सुरक्षित पदपथ विकसित केले जात आहेत. दिव्यांगांनाही त्यांचा सहज वापर करता येईल. 'हरित सेतू' अंतर्गत प्राधिकरणातील रस्त्यांचे सौंदर्यीकरण केले जात आहे. सर्व रस्ते एकमेकांना जोडून नागरिकांना घरापासून दुकानापर्यंत सुरक्षितपणे चालत जाणे सहज शक्य होईल, असे नियोजन आहे.

-विजय भोजने, कार्यकारी अभियंता, महापालिका

शंकरवाडी- कासारवाडी- पिंपळे गुरव सृष्टी चौक रस्ता

### सौंदर्य वाढलेले प्रातिनिधिक रस्ते

» संतोषी माता चौक नेहरूनगर ते यशवंतनगर रस्ता

» आकुर्डी रेल्वेस्थानक परिसरातील सर्वच रस्ते

» लिंक रस्त्यासह चिंचवडमधील अंतर्गत बहुतांश रस्ते

---

## १३ वे राज्यस्तरीय खगोल अभ्यासक संमेलन

# » पिंपरी चिंचवड सायन्स पार्क आणि तारांगण येथे आयोजन

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**सर्वसामान्य लोकांमध्ये आकाश निरीक्षणाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने १३ वे राज्यस्तरीय खगोल अभ्यासक संमेलन मराठी खगोल अभ्यासक मंडळ, नांदेड आणि पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व तारांगण यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४-१५ डिसेंबर २०२४ दरम्यान पिंपरी चिंचवड सायन्स पार्क आणि तारांगण, चिंचवड, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.**




या संमेलना दरम्यान चर्चेला घेतलेले महाराष्ट्रातील खगोल अभ्यासकांचा भविष्यवेत्ते चंद्रशेखर, वेध अंतरिक्षाचा.. सहभाग आपला, हौशी खगोल शास्त्राचे बदलते स्वरूप, उल्कापिंड अभ्यास, उल्कापिंडांना अंतराळ मोहिमांद्वारे गवसणी, खगोलीय भू-शास्त्र, परग्रहवासीयांचा शोध, रेडिओ दुर्बीण या विषयी होणारे परिसंवाद/ व्याख्याने, आकाशाला गवसणी व आयसर पुणे कल्पकघर, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका निर्मित नवीनच उभारण्यात आलेल्या तारांगणाची भेट आणि पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथील विविध विज्ञान सुविधांची वैज्ञानिक सहल, महाराष्ट्रातील विविध खगोल जागृती संस्थांद्वारा आयोजित कार्यक्रमांचा परिचय अशा भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे. पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे संस्थापक-संचालक श्री. प्रवीण तुपे आणि मराठी खगोल अभ्यासक मंडळ कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाअंतर्गत संपन्न होणाऱ्या या राज्यस्तरीय संमेलनाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या शुभहस्ते होणार आहे.

### कार्यक्रमासाठी येणाऱ्या प्रतिनिधींसाठी नाव नोंदणी

या वेळेस तारांगण परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या 'व्यंकटेश बापुजी केतकर' व 'सूर्याचा व्यास मोजणे' या आयुका, पुणे तर्फे घेण्यात आलेल्या प्रकल्पाबद्दलची माहितीपत्रके प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. या संपूर्ण संमेलनाची विस्तृत कार्यक्रमपत्रिका पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच कार्यक्रमासाठी येणा-या प्रतिनिधींसाठीची नाव नोंदणी शुल्क रु. ८००/- (निवास व्यवस्था वगळून) व निवास व्यवस्थेसह रु. १०००/- प्रतिव्यक्ती आहे. संमेलनात सहभागी होणा-या व्यक्तींनी आपली स्वीकृती मराठी खगोल अभ्यासक मंडळाच्या 13aampune@gmail.com या ई-मेलवर दि. ०८ डिसेंबर २०२४ पर्यंत कळवावी.

अधिक माहितीकरीता मराठी खगोल अभ्यासक मंडळाचे सचिव श्रीनिवास औंधकर (9422171256), कोषाध्यक्ष सचिन मालेगावकर (9922212099) आणि सायन्स पार्कडील समन्वयक सुनिल पोटे (9552994294) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.




# देशापुढे कोणते प्रश्न महत्त्वाचे?

**देशासमोर बेरोजगारी, महागाई, कृषीक्षेत्राची पीछेहाट, निर्यात आणि उत्पादन क्षेत्रातील घट असे विविध ज्वलंत प्रश्न असताना त्यावर चर्चा किंवा यावर कसे उपाय योजता येतील याचा ऊहापोह होताना दिसत नाही. देशाची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलर्सची करण्याचे सरकारचे ध्येय असले तरी सकल देशांतर्गत उत्पादनातील नीचांकी घट डोळ्यांत अंजन घालणारी ठरावी.**

भाजीपाला, कांदे, लसूण, डाळी, तांदूळ अशा जीवनावश्यक वस्तू महागल्या असताना चर्चा होते ती 'बटेंगे तो काटेंगे', 'एक है तो सेफ है' अशा घोषणांवर. संभल, अजमेर, काशी, मथुरा अशा धार्मिक स्थळांवर हक्क कोणाचा या मुद्द्यांना प्राधान्य मिळते. या पार्श्वभूमीवर संभलमधील हिंसाचाराच्या घटनेची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला ते योग्यच झाले. संभल शांत झाले पण अजमेरवरून वातावरण गढूळ होत आहे. धार्मिक ध्रुवीकरणातून मतांचे गणित जुळत असल्याने राजकीय पक्षांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांऐवजी धार्मिक मुद्द्यांनाच हात घातलेला दिसतो. नुकत्याच झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महागाई, बेरोजगारी, रस्त्यांवर पडलेले खड्डे हे सगळे मुद्दे गौण ठरले आणि धर्मवादाचे छुपे आवाहन करणाऱ्या घोषणांभोवतीच प्रचार केंद्रित




झाला होता. उत्तर प्रदेशातील संभलमधील मुघलकालीन शाही जामा मशिदीच्या जागेवर मंदिर होते या याचिकेवर स्थानिक न्यायालयाने सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला आणि त्याची हिंसक प्रतिक्रिया उमटली. यातून पोलीस गोळीबारातच चार जणांचा मृत्यू झाला. सर्वोच्च न्यायालयाने सर्वेक्षणाला स्थगिती दिलेली नसली तरी उच्च न्यायालयात निवाडा होईपर्यंत कोणताही आदेश देऊ नये, असे स्थानिक न्यायालयाला बजावले आहे. शांतता आणि सामाजिक सौहार्द राखण्याला सर्वोच्च न्यायालयाने प्राधान्य दिले.संभलचे प्रकरण ताजे असतानाच अजमेरच्या जगप्रसिद्ध सुफी संत ख्वाजा मोइनुउद्दीन चिस्ती दर्ग्याच्या जागी शीव मंदिर होते व दर्गा हा संकट मोचन महादेव मंदिर असल्याचे जाहीर करावे म्हणून हिंदू सेनेच्या विष्णू गुप्ता यांनी दाखल केलेल्या याचिकेवर स्थानिक न्यायालयाने प्रशासनाला नोटीस बजावली. अयोध्येतील रामजन्मभूमी – बाबरी मशीद वादात सारा देश होरपळला होता. मथुरेतील कृष्ण जन्मभूमी, वाराणसीतील ग्यानवापी मशीद , मध्य प्रदेशातील भोजशाळा या धार्मिक स्थळांवर अधिकार कोणाचा ही प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना संभल आणि अजमेरची त्यात भर पडली आहे. भविष्यात आणखी काही धार्मिक स्थळांवरून वाद उकरून काढला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामागे मतांचे राजकारण आहे हे लपून राहिलेले नाही.अयोध्येतील रामजन्मभूमी – बाबरी मशीद वाद चिघळला असता १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव सरकारने प्रार्थनास्थळांचा (प्लेसेस ऑफ वर्शिप अॅक्ट, १९९१) कायदा केला होता.१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशातील धार्मिक स्थळांवर ज्यांचा अधिकार होता तो कायम राखला जाईल, अशी स्पष्ट तरतूद त्यात करण्यात आली होती. या कायद्याला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयापुढे आजही 'प्रलंबित'च असताना, मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाच्याच एका निकालाने हा कायदा 'मागल्या दाराने' निष्प्रभ करण्यात आला. प्रार्थनास्थळांचे जतन करण्याचा कायदा असला तरी वास्तूचे धार्मिक स्थान काय आहे याची पाहणी वा सर्वेक्षण करण्याचा अधिकार असल्याचा निर्वाळा न्या. धनंजय चंद्रचूड यांनी मे २०२२ मध्ये दिला होता. चंद्रचूड यांच्या या निकालाने धार्मिक स्थळांबाबत पुन्हा वाद निर्माण होऊ लागले. धार्मिक वादाला फोडणी देण्याकरिताच विविध प्रार्थनास्थळांचा वाद उकरून काढला जाऊ लागला. 'प्रत्येक मशिदीत शिवलिंग कसे दिसते,' असा सवाल करीत रा. स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी नवीन वाद उकरून काढण्याच्या कृतीबद्दल जून २०२२ मध्ये तीव्र नापसंती व्यक्त केली होती. भागवत यांनी कानउघडणी करूनही फारसा परिणाम झालेला दिसत नाही. धार्मिक स्थळांच्या वादावरून राजकीय पक्षांना त्याचा फायदाच होतो. धार्मिक ध्रुवीकरणासाठी राजकीय पक्षांना ते उपयुक्त ठरते.

## प्रासंगिक »

# महाराष्ट्रातील प्रश्न!

***नुकत्याच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या विजयाचा अर्थ लावण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या पातळीवर सुरू आहेत.***

महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या विजयाचे मला जेवढे आश्चर्य वाटले नाही, तेवढेच सहज जिंकता यायला हवी होती अशी निवडणूक विरोधातील महाविकास आघाडीला जिंकता आली नाही याचेही मला आश्चर्य वाटले नाही. तरीही मला एखादी त्सुनामी असावी तशा पद्धतीच्या महायुतीच्या या विजयाचा अर्थ समजू शकलेला नाही. या विजयाचा अर्थ समजून घेण्यासाठी ना मला माझी राजकीय समज कामाला येते आहे, ना मला काहीसे तांत्रिक म्हणता येईल असे राज्यशास्त्र उपयोगी पडत आहे. पण एवढ्या फरकाने महायुती जिंकली कशी, असा प्रश्नही मी विचारू शकत नाही.ही खरेतर गंभीर गोष्ट आहे. निवडणूक निकालावर कोणताही गंभीर प्रश्न उपस्थित केला जात असेल, तर त्या निकालाने काही प्रथमदर्शनी विश्वासार्हता चाचण्या पार केल्या पाहिजेत.

चिप तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या 'हुआवे' या चिनी कंपनीवर केलेला आघात केवळ हुआवेपुरताच सीमित नव्हता. डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीनशी व्यापार युद्धाचा भाग म्हणून आणि 'राष्ट्रीय सुरक्षा' या कोणत्याही देशातील नागरिकांच्या सार्वकालिक जिव्हाळ्याच्या मुद्द्याचा योग्य वापर करून विविध उच्च-तंत्रज्ञान कंपन्यांवर अनेक जाचक निर्बंध लादले.

# चिपच्या आडून व्यापारयुद्धच

पुढे बायडेन प्रशासनानंही या बाबतीत तरी बऱ्याच प्रमाणात ट्रम्प यांच्या धोरणांची री ओढली.अमेरिकेनं हुआवे, 'झेडटीई' या दूरसंचार क्षेत्रातील आघाडीच्या चिनी कंपन्यांना लक्ष्य केलंच पण नंतर टिकटॉक आणि वीचॅटसारख्या लोकप्रिय चिनी अॅप्सवरही विदा गोपनीयता उल्लंघनाच्या कारणास्तव बंदी घालण्याचा प्रयत्न केला. पुढे २०२२ मध्ये अमेरिकेनं 'एनव्हिडिया' आणि 'एएमडी'सारख्या कंपन्यांना चीनमधल्या आस्थापनांना एआय मॉडेलिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या जीपीयू चिप विकायलाही बंदी घातली. २०२३ मध्ये तर अमेरिकेच्या कोणत्याही कंपनीला चीनमध्ये एआय, क्वान्टम संगणन, सेमीकंडक्टर अशा प्रत्येक हाय-टेक क्षेत्रात गुंतवणूक करण्यावर बंदी घातली गेली. बरं, ही बंदी केवळ अमेरिकी कंपन्यांपुरती मर्यादित नव्हती. अमेरिकेने मित्रदेशांनाही चीनवर निर्बंध लादण्यासाठी प्रोत्साहित केलं आणि एखाद दुसऱ्या देशाचा अपवाद वगळल्यास बाकीच्यांनी असे निर्बंध



लगेच अमलातही आणले.साहजिकच अशा प्रकारे सर्वंकषपणे लादलेल्या बंदीचा केवळ हुआवेवरच नव्हे तर संपूर्ण चिनी हाय-टेक क्षेत्रावर विपरीत परिणाम न झाला तरच नवल! हाय-टेक (आणि ज्यावर हे क्षेत्र पूर्णपणे अवलंबून आहे अशा सेमीकंडक्टर) पुरवठा साखळीत चीनला चहूबाजूंनी कोंडीत पकडून अमेरिका चीनशी सुरू असलेल्या व्यापार युद्धात, काही काळासाठी का असेना, विजय मिळवण्यात नक्कीच यशस्वी ठरली होती. तार्किकदृष्ट्या विचार केल्यास या घडामोडीत दोन प्रश्न तरीही अनुत्तरित राहतात : (१) अमेरिकेनं हुआवे आणि इतर चिनी कंपन्यांवर घातलेल्या बंदीमागे खरोखरच ह्यहेरगिरीह्व हे कारण होतं की हा केवळ जगासमोर केलेला देखावा होता आणि पडद्यामागे काही वेगळीच कारणं या निर्बंधांमागे होती? (२) प्रत्येक क्रियेला एक प्रतिक्रिया असते हा निसर्गनियम आहे, जो भूराजकीय परिप्रेक्ष्यातही लागू होतो. विशेषत: जेव्हा प्रतिस्पर्धी देश हा चीन सारखा धूर्त आणि तगडा असेल तेव्हा तो मूग गिळून गप्प बसेल यावर केवळ भाबड्या जनांचा विश्वास बसू शकेल. तेव्हा अमेरिकेच्या या चालीवर चीननं आजवर काय प्रतिचाल केली आणि भविष्यात काय करू शकेल याचं विश्लेषण करणं अगत्याचं ठरतं.तसं पाहायला गेलं तर बौद्धिक संपदा चोरीच्या आरोपांप्रमाणे हुआवेवर केलेले विदाचौर्य, हेरगिरी किंवा टेहळणीचे आरोप आजतागायत सिद्ध होऊ शकलेले नाहीत. कंपनीनं तर कधीही मान्य केलेले नाही. उलट आपलं निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी हुआवेनं ब्रिटिश शासनाशी करार करून आपल्या उपकरणांचं तांत्रिक परीक्षण एखाद्या स्वतंत्र व निरपेक्ष संस्थेकडून करून घेण्यासाठी एक प्रयोगशाळाही उभारली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीसच मुख्यमंत्री होणार का?

## शपथविधी सोहळ्याच्या अगोदर महायुतीच्या नेत्यांची बैठक

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुका झाल्या असून महायुतीला लोकांनी मोठा पाठिंबा दिला. महायुतीकडून सत्तास्थापनेची जोरदार तयारी सुरू असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील शपथविधी सोहळ्यासाठी उपस्थित असणार आहेत. मात्र, मुख्यमंत्री कोण होणार या नावाची अजूनही घोषणा करण्यात नाही आली.**



सुरूवातीला सांगितले जात होते की, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नावात रस्सीखेच सुरू आहे. मात्र, एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडला. आता जवळपास हे स्पष्ट आहे की, भाजपाचाच मुख्यमंत्री होणार आहे. पाच तारखेला शपथविधी सोहळ्याच्या अगोदर महायुतीच्या नेत्यांची एक बैठक होईल. शपथविधीमध्ये केवळ मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री शपथ घेणार की मंत्र्यांचाही एकत्र शपथविधी होणार हे ठरवण्यात येणार आहे. महायुतीचा सर्वात मोठा घटक असलेल्या भाजपने अद्याप आपल्या विधिमंडळ पक्षनेत्याचे नाव जाहीर केलेले नाही. विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत विजय मिळून आता आठवडा उलटला आहे. पण अद्यापही सरकार स्थापन झालेलं नाही. मुख्यमंत्रिपदाचा, खातेवाटपाचा पेच कायम असल्यानं सत्ता स्थापना रखडली आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी अचानक गावी निघून गेले. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठीच्या महायुतीच्या बैठका रद्द झाल्या. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना त्यांनी गृहमंत्रिपद स्वत:कडे ठेवलं होतं. शिवसेनेनं गृहमंत्रिपदाची मागणी कायम ठेवली आहे. सेनेला नैसर्गिक न्यायानं गृहखातं मिळावं अशी अपेक्षा आमदार संजय शिरसाट यांनी व्यक्त केली. अजित पवार यांनी शनिवारी सांगितले की, मुख्यमंत्री भाजपचा असेल तर उपमुख्यमंत्री दोन्ही मित्रपक्षांचे असतील. शपथविधी अगोदर भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची एक बैठक होणार असल्याचेही सांगितले जातंय. जवळपास देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट आहे. देवेंद्र फडणवीस यांचे नाव जरी सध्या चर्चेत असले तरीही विनोद तावडे यांचेही नाव मुख्यमंत्रीपदाच्या रेसमध्ये बघायला मिळतंय. राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी शपथविधी सोहळ्याबाबत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याचे सांगितले. आमचे नेते अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी आम्हाला कोणतीही माहिती दिलेली नाही, असे त्यांनी म्हटले. आता भाजपाच्या बैठकीकडे सर्वांच्या नजरा आहेत. हेच नाही तर विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असून भाजपामधून मुख्यमंत्री होणार असल्याचे स्पष्ट असतानाच आतापर्यंत मुख्यमंत्रीपदाचे नाव जाहीर करण्यात नाही आल्याने विविध चर्चा या रंगताना दिसत आहेत. देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होणार का? की, भाजपाकडून अजून कोणत्या नावाचा विचार सुरू आहे, याबद्दल चर्चा सुरू आहे.सुरूवातीला सांगितले जात होते की, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नावात रस्सीखेच सुरू आहे. मात्र, एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडला. आता जवळपास हे स्पष्ट आहे की, भाजपाचाच मुख्यमंत्री होणार आहे. पाच तारखेला शपथविधी सोहळ्याच्या अगोदर महायुतीच्या नेत्यांची एक बैठक होईल. शपथविधीमध्ये केवळ मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री शपथ घेणार की मंत्र्यांचाही एकत्र शपथविधी होणार हे ठरवण्यात येणार आहे. महायुतीचा सर्वात मोठा घटक असलेल्या भाजपने अद्याप आपल्या विधिमंडळ पक्षनेत्याचे नाव जाहीर केलेले नाही. विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत विजय मिळून आता आठवडा उलटला आहे. पण अद्यापही सरकार स्थापन झालेलं नाही. मुख्यमंत्रिपदाचा, खातेवाटपाचा पेच कायम असल्यानं सत्ता स्थापना रखडली आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी अचानक गावी निघून गेले. त्यामुळे सत्ता स्थापनेसाठीच्या महायुतीच्या बैठका रद्द झाल्या. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना त्यांनी गृहमंत्रिपद स्वत:कडे ठेवलं होतं. शिवसेनेनं गृहमंत्रिपदाची मागणी कायम ठेवली आहे. सेनेला नैसर्गिक न्यायानं गृहखातं मिळावं अशी अपेक्षा आमदार संजय शिरसाट यांनी व्यक्त केली. अजित पवार यांनी शनिवारी सांगितले की, मुख्यमंत्री भाजपचा असेल तर उपमुख्यमंत्री दोन्ही मित्रपक्षांचे असतील.

### बैठकीकडे सर्वांच्या नजरा

राष्ट्रीय समाज पक्ष ईव्हीएमच्या विरोधात देशभर आंदोलन करणार आहे. विरोधक जर या आंदोलनात सामील होणार असेल तर त्यांचेही आम्ही स्वागत करू.ईव्हीएम हॅक होऊ शकते का? या प्रश्नावर बोलताना महादेव जानकर यांनी आपल्या इंग्रजी बोलण्याच्या शैलीत या विषयावर भाष्य केले. "ईव्हीएम हॅक होते. आय एम अल्सो द इंजिनिअर. आय नो दॅट. विमान हॅक करता येते, सर्व काही हॅक करता येते. लोकशाही जिवंत ठेवायचे असेल तर त्यांनी मतपत्रिकेवर निवडणूक घ्यावी. आम्ही त्यांचे स्वागत करू." जानकर पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालय, सर्व यंत्रणा, निवडणूक आयोग, माध्यमे अशा लोकशाहीच्या चारही स्तंभावर आज त्यांचे नियंत्रण आहे. त्यामुळे याला लोकशाही म्हणताच येणार नाही.

# पुढील उपोषण आझाद मैदानात

## तुळजापुरातून मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांची घोषणा

। तुळजापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरकार कोणाचेही आले तरी आरक्षण घेणारच. त्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन सुरु आहे. आता सामूहिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरवली सराटीसह प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल. समाजाचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. कदाचित यावेळी मुंबई येथे आझाद मैदानावर असू शकेल, अशी जाहीर घोषणा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केली.**

विधानसभा निवडणुकीत फॉर्म्युला जुळला नाही अन्यथा सुपडा साफ केला असता, अशा शब्दांत त्यांनी राजकीय टिप्पणीही केली. जरांगे पाटील हे आंतरवली सराटी येथून रविवारी तुळजापूर आणि पंढरपूर येथे दर्शनासाठी निघाले होते. धाराशिव जिल्ह्यात त्यांचा ताफा दाखल होताच ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. आरक्षणाची यापुढील लढाई सामूहिक आमरण उपोषणाने केली जाईल. कदाचित हे उपोषण मुंबई येथे आझाद मैदानावरही



होऊ शकते. आता आरक्षणाची ही चळवळ थांबवणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. समाजाने मोठ्या संख्येने ओबीसी आमदारही निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान फॉर्म्युला जुळून आला नाही. अन्यथा सुपडा साफ केला असता. मराठा आरक्षणासाठी इथून पुढे सामूहिक आमरण उपोषणाचे हत्यार उपसणार असल्याचे जाहीर करुन सरकार कोणाचेही असो, मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. त्यासाठी मुंबई येथे आझाद मैदानावरही आंदोलन करण्याची वेळ आल्यास मागे हटणार नाही.

### प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल

दरम्यान, जरांगे पाटील यांचा ताफा जिल्ह्यात दाखल होताच महामार्गावरील विविध गावांत त्यांचे फुलांची उधळण करुन स्वागत करण्यात आले. तीर्थक्षेत्र तुळजापुरात मोठ्या जल्लोषात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत मराठा समाजबांधवांनी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत उत्स्फुर्त रॅली काढली. त्यानंतर जरांगे पाटील यांनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांचा ताफा पंढरपूरकडे रवाना झाला.सरकार कोणाचेही आले तरी आरक्षण घेणारच. त्यासाठी पुढील कार्यक्रमाचे नियोजन सुरु आहे. आता सामूहिक आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरवली सराटीसह प्रत्येक घरात हे उपोषण केले जाईल.

# 9 देशांना डोनाल्ड ट्रम्पनी दरडावले!

## ‘ब्रिक्स’ देश डॉलरपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अमेरिकेत नुकत्याच झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी बाजी मारली आहे. या विजयानंतर ट्रम्प यांचा शपथविधीही झाला नाही, तेवढ्यातच त्यांनी भारतासह नऊ देशांचा समावेश असलेल्या ‘ब्रिक्स’ संघटनेला, अमेरिकन डॉलर कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्यास १०० टक्के आयात शुल्क लादण्यासह व्यापर बंद करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान ‘ब्रिक्स’ संघटनेत भारतासह ब्राझील, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, इजिप्त, इथिओपिया, इराण आणि संयुक्त अरब अमिराती या देशांचा समावेश आहे.**



यूएस डॉलर हे जागतिक व्यापारात आतापर्यंत सर्वाधिक वापरले जाणारे चलन आहे. विकसनशील देशांचे म्हणणे आहे की, ते जागतिक आर्थिक व्यवस्थेतील अमेरिकेच्या वर्चस्वाला कंटाळले आहेत. यूएस डॉलर आणि युरोवरील जागतिक अवलंबित्व कमी करून ब्रिक्स देशांना त्यांचे आर्थिक हित अधिक चांगल्या पद्धतीने पुढे चालवायचे आहे.गेल्या वर्षी २०२३ मध्ये पार पडलेल्या ‘ब्रिक्स’ परिषदेत सदस्य देशानी स्वत:चे चलन सुरु करण्याबाबत चर्चेसह BRICS देशांमध्ये परस्पर व्यापार आणि गुंतवणुकीसाठी एक समान चलन तयार करण्याचा प्रस्ताव दिला होता. याच प्रस्तावामुळे डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत.डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, “आम्ही पाहत आहोत की, ‘ब्रिक्स’ देश डॉलरपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण ही कल्पना आता संपली आहे. आम्हाला या देशांकडून वचन हवे आहे की, ते नवीन ‘ब्रिक्स’ चलन तयार करणार नाहीत किंवा शक्तिशाली अमेरिकन डॉलरच्या जागी इतर कोणत्याही चलनाला समर्थन देणार नाहीत, अन्यथा त्यांना १०० टक्के आयात शुल्काला सामोरे जावे लागेल किंवा त्यांना अमेरिकन बाजारपेठेत विक्री करणे विसरून जावे लागेल.”नऊ कायमस्वरूपी सदस्यांव्यतिरिक्त, ‘ब्रिक्स’मध्ये इतर अनेक देश देखील सहभागी होत आहेत. यामध्ये इराण, इजिप्त, इथिओपिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा नुकताच समावेश झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून, ‘ब्रिक्स’ देश, विशेषत: रशिया आणि चीन अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून स्वतःचे ‘ब्रिक्स’ चलन सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, भारताने अद्याप अशा कोणत्याही पावलावर सहभाग घेतलेला नाही.यूएस डॉलर हे जागतिक व्यापारात आतापर्यंत सर्वाधिक वापरले जाणारे चलन आहे. विकसनशील देशांचे म्हणणे आहे की, ते जागतिक आर्थिक व्यवस्थेतील अमेरिकेच्या वर्चस्वाला कंटाळले आहेत. यूएस डॉलर आणि युरोवरील जागतिक अवलंबित्व कमी करून ब्रिक्स देशांना त्यांचे आर्थिक हित अधिक चांगल्या पद्धतीने पुढे चालवायचे आहे.गेल्या वर्षी २०२३ मध्ये पार पडलेल्या ‘ब्रिक्स’ परिषदेत सदस्य देशानी स्वत:चे चलन सुरु करण्याबाबत चर्चेसह BRICS देशांमध्ये परस्पर व्यापार आणि गुंतवणुकीसाठी एक समान चलन तयार करण्याचा प्रस्ताव दिला होता. याच प्रस्तावामुळे डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत.डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, “आम्ही पाहत आहोत की, ‘ब्रिक्स’ देश डॉलरपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण ही कल्पना आता संपली आहे. आम्हाला या देशांकडून वचन हवे आहे की, ते नवीन ‘ब्रिक्स’ चलन तयार करणार नाहीत किंवा शक्तिशाली अमेरिकन डॉलरच्या जागी इतर कोणत्याही चलनाला समर्थन देणार नाहीत, अन्यथा त्यांना १०० टक्के आयात शुल्काला सामोरे जावे लागेल किंवा त्यांना अमेरिकन बाजारपेठेत विक्री करणे विसरून जावे लागेल. यामध्ये इराण, इजिप्त, इथिओपिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा नुकताच समावेश झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून, ‘ब्रिक्स’ देश, विशेषत: रशिया आणि चीन अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून स्वतःचे ‘ब्रिक्स’ चलन सुरू करण्याचा प्रयत्न करत आहेत.

### चलनाला समर्थन देणार नाही

यूएस डॉलर हे जागतिक व्यापारात आतापर्यंत सर्वाधिक वापरले जाणारे चलन आहे.‘ब्रिक्स’ परिषदेत सदस्य देशानी स्वत:चे चलन सुरु करण्याबाबत चर्चेसह BRICS देशांमध्ये परस्पर व्यापार आणि गुंतवणुकीसाठी एक समान चलन तयार करण्याचा प्रस्ताव दिला होता. याच प्रस्तावामुळे डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत.डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, “आम्ही पाहत आहोत की, ‘ब्रिक्स’ देश डॉलरपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. नवीन ‘ब्रिक्स’ चलन तयार करणार नाहीत किंवा शक्तिशाली अमेरिकन डॉलरच्या जागी इतर कोणत्याही चलनाला समर्थन देणार नाहीत, अन्यथा त्यांना १०० टक्के आयात शुल्काला सामोरे जावे लागेल किंवा त्यांना अमेरिकन बाजारपेठेत विक्री करणे विसरून जावे लागेल.

# बांगलादेशमधील हिंदूंसाठी RSS मैदानात

## बांगलादेशमध्ये आणखी दोन हिंदू संन्याशांना अटक

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बांगलादेशमध्ये हिंदूंसह इतर अल्पसंख्याक समुदायातील लोकांवर अत्याचार होत आहेत. त्यामुळे इस्कॉनचे माजी सदस्य व तिथल्या हिंदूंवरील अत्याचारांविरोधात आंदोलन करणारे हिंदू संन्यासी चिन्मय कृष्ण दास यांना बांगलादेशी सरकारने तुरुंगात डांबलं आहे. पाठोपाठ आता तिथल्या आणखी दोन संन्याशांना अटक करण्यात आल्याचं वृत्त समोर आलं आहे.**



इस्कॉन कोलकाताचे प्रवक्ते राधारमण दास यांनी शनिवारी (३० नोव्हेंबर) म्हटलं की “बांगलादेशमध्ये आणखी दोन हिंदू संन्याशांना अटक करण्यात आली आहे. हे दोन्ही हिंदू संन्यासी इस्कॉनशी संबंधित आहेत”. राधारमण पीटीआयशी बोलत होते. त्यांनी शुक्रवारी एक्सवर एक पोस्ट केली होती. त्यामध्ये म्हटलं होतं की “आम्हाला नुकतीच एक वाईट बातमी मिळाली आहे. चिन्मय प्रभू यांच्यासाठी प्रसाद घेऊन गेलेले दोन संन्यासी प्रसाद देऊन मंदिरात परतल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्याचबरोबर चिन्मय प्रभू यांचे सचिव देखील बेपत्ता आहेत. कृपया त्यांच्यासाठी सर्वांनी प्रार्थना करावी”.याआधी देखील राधारमण यांनी एक पोस्ट केली होती की “आमचे आणखी एक संन्यासी श्री श्याम दास प्रभू यांना चटोग्राम पोलिसांनी अटक केली आहे”. त्यांनी एक्सवर म्हटलं होतं की “श्याम दास प्रभू दहशतवादी आहेत का? त्यांनी काय केलंय? बांगलादेश सरकारने इस्कॉनच्या निर्दोष संन्याशांना तुरुंगातून मुक्त करावं. इस्कॉनमधील संन्याशांना झालेल्या अटकेचं वृत्त पाहून आम्हाला मोठा धक्का बसला आहे.


### अमानवीय अत्याचार खूप चिंताजनक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शनिवारी (३० नोव्हेंबर) एक निवदेन जारी केलं आहे. संघाने बांगलादेशात हिंदू समुदायावर होत असलेल्या अत्याचारांचा कठोर शब्दांत निषेध नोंदवला आहे. संघाचे सहकार्यवाहक दत्तात्रेय होसबाळे यांनी या निवेदनात म्हटलं आहे की “बांगलादेशात हिंदू व इतर अल्पसंख्याक समुदायातील लोकांवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायातील मुलं व महिलांवरील अमानवीय अत्याचार खूप चिंताजनक आहेत.

# लिपाने कॉन्सर्टमध्ये शाहरुखच्या चाहत्यांना दिलं सरप्राइज

जगप्रसिद्ध गायकांचे नेहमी मुंबईत लाइव्ह कॉन्सर्ट होतं असतात. या लाइव्ह कॉन्सर्टला अनेक सेलिब्रिटी उपस्थिती लावतात. नुकताच जगप्रसिद्ध गायिका दुआ लिपाचा मुंबईत लाइव्ह कॉन्सर्ट झाला. या कॉन्सर्टला सर्वसामान्यांसह सेलिब्रिटींनी खास हजेरी लावली होती. यावेळी उद्योगपती मुकेश अंबानींची धाकटी सून राधिका अंबानी, ईशा अंबानी पाहायला मिळाली. दुआ लिपाच्या लाइव्ह कॉन्सर्टमधील अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मुंबईत झालेल्या लाइव्ह कॉन्सर्टमध्ये गायिका दुआ लिपाने शाहरुख खानच्या चाहत्यांना एक जबरदस्त





सरप्राइज दिलं. या लाइव्ह कॉन्सर्टमध्ये दुआ लिपाने शाहरुखचं 'वो लडकी जो' गाणं आणि तिच्या गाण्याचं मॅशअप लावलं. त्यानंतर शाहरुखच्या चाहत्यांनी एकच गोंधळ घातला. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे.दुआ लिपाच्या लाइव्ह कॉन्सर्टमधील व्हिडीओ शाहरुखची लेक सुहाना खानने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करत तिने काही इमोजी शेअर केले आहेत.दरम्यान, सोशल मीडियावर नेहमी कोणतं ना कोणतं गाणं ट्रेंड होतं असतं. तसंच सोशल मीडियावरील बरेच युझर्स आहेत, जे इतर भाषांमधील गाणी आपल्या भाषेतील गाण्यांमध्ये मिक्स करून मॅशअप करत असतात.

## नताशाच्या घरी आनंदाची बातमी

बॉलीवूड अभिनेता वरुण धवन बाबा झाला आहे. वरुण धवन व नताशा दलाल यांच्या घरी चिमुकल्या सदस्याचं आगमन झालं आहे. नताशाने आज बाळाला जन्म दिला असून वरुणचे बाबा व बाळाचे आजोबा डेव्हिड धवन यांनी आनंदाची बातमी दिली आहे.आज दुपारी वरुण मुंबईतील रुग्णालयाबाहेर पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाला होता. तेव्हापासून वरुणच्या बाळाबद्दल चर्चा सुरू होती. नताशाची प्रसूती झाली असून तिने गोंडस लेकीला जन्म दिला आहे. डेव्हिड धवन यांनी बाळाची भेट घेऊन रुग्णालयातून निघताना नताशाने मुलीला जन्म दिल्याची माहिती दिली. डेव्हिड धवन यांचा व्हिडीओ वरिंदर चावला या पापाराझी अकाउंटवरून शेअर करण्यात आला आहे. वरुण व नताशा यांना मुलगी झाली आहे, असं डेव्हिड धवन यांनी सांगितलं.वरुण धवन व नताशा लग्नानंतर तीन वर्षांनी आई- बाबा झाले आहेत. फेब्रुवारी महिन्यात वरुण व नताशा यांनी ते आई-बाबा होणार असल्याची बातमी सोशल मीडियावर पोस्ट करून शेअर केली होती. वरुणने नताशा व त्याचा एक फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला होता. फोटोमध्ये वरुण गरोदर नताशाच्या बेबी बंपचे चुंबन घेताना दिसत होता. हा फोटो शेअर करत त्याने "आम्ही प्रेग्नंट आहोत, आम्हाला तुमच्या प्रेमाची व आशीर्वादाची गरज आहे," असं लिहिलं होतं. सेलिब्रिटी व चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट करत दोघांचे अभिनंदन केले होते.



## वडिलांचा हात धरून स्टेजवर आली आयरा

बुधवारी संध्याकाळी आमिर खानची मुलगी आयरा आणि फिटनेस एक्सपर्ट नुपूर शिखरे यांचा उदयपूरच्या हॉटेल ताज अरावली पॅलेसमध्ये विवाह झाला. हॉटेलच्या मयूरबागेत दुपारी 4 वाजता सुरू झालेल्या लग्नसोहळ्यासाठी आमिर खान आणि त्याची आई झीनत हुसैन वधू आयराला मंचावर घेऊन आले. यानंतर आयरा आणि नुपूर शिखरे यांनी एकमेकांचा हात धरला आणि एकत्र राहण्याचे वचन दिले. दोघांनीही एकमेकांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी पांढऱ्या रंगाच्या थीमने मंडप सजवण्यात आला होता. लग्नानंतर, एक कौटुंबिक फोटोशूट झाले ज्यामध्ये आमिर खानच्या दोन्ही माजी पत्नी रीना दत्ता, किरण राव, पुतण्या इम्रान खानसह त्याचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. फोटोशूटनंतर रात्रीचे जेवण झाले ज्यात पाहुण्यांना महाराष्ट्रीयन, राजस्थानी आणि गुजराती जेवण देण्यात आले. कढी-तांदूळ, राजस्थानी डाळ-बाती-चुरमा आणि डाळ-ढोकळा यांचाही मेनूमध्ये विशेष समावेश होता. तत्पूर्वी, मंगळवारी रात्री एका संगीत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये आमिरने हृतिक रोशनच्या 'कोई मिल गया' या चित्रपटातील 'इट्स मॅजिक...' या गाण्यावर खास परफॉर्मन्स दिला होता. आमिरने दुसरी माजी पत्नी किरण राव आणि मुलगा आझादसोबत स्टेजवर 'एक हजारों में मेरी बहना है..' हे गाणे गायले. या कार्यक्रमात परफॉर्म करण्यासाठी आमिर गेल्या काही दिवसांपासून शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेत होता. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या संगीत सेरेमनीमध्ये आयरा आणि नुपूरच्या कुटुंबातील सदस्यांनी आपापल्या परफॉर्मन्स दिला. पाहुण्यांनी पंजाबी आणि बॉलीवूड गाण्यांवर जोरदार नृत्य केले. फंक्शनमध्ये आयरा एम्ब्रॉयडरी लेहेंग्यात तर नुपूर पँट-सूटमध्ये दिसला. या जोडप्याचे मित्र आणि कुटुंबातील सदस्यांनी सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ शेअर केले आहेत.

## ऐश्वर्याच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन गेल्या अनेक दिवसांपासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. दरम्यान, ऐश्वर्या राय आता अभिषेक बच्चनच्या कबड्डी संघाला चिअर करताना दिसली. ऐश्वर्याचा व्हिडिओ समोर येताच तिच्या घटस्फोटाच्या अफवांना पूर्णविराम लागला आहे. अलीकडेच, स्टार स्पोर्ट्स इंडियाने प्रो कबड्डी लीगचा एक व्हिडिओ जारी केला आहे, ज्यामध्ये ऐश्वर्या राय, अभिषेक बच्चन, आराध्या बच्चन आणि अमिताभ कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरला सपोर्ट करताना दिसत आहेत. संपूर्ण बच्चन कुटुंब टीमला सपोर्ट करताना खूप आनंदी दिसत असल्याचं व्हिडिओमध्ये पाहायला मिळत आहे. संघ जिंकल्यावर संपूर्ण कुटुंब आनंदाने जल्लोषात होते. अभिषेक बच्चन कबड्डी संघ जयपूर पिंक पँथरचा मालक आहे. प्रो कबड्डी लीगच्या 10 व्या हंगामात जयपूर पिंक पँथरचा सामना 7 जानेवारी रोजी यू मुंबाशी झाला. जयपूर संघाने मुंबई संघाचा 41-31 असा पराभव करत विजय मिळवला. संपूर्ण बच्चन कुटुंब प्रो कबड्डी लीगचा सामना पाहण्यासाठी त्याच जर्सी घालून आले होते. समोर आराध्या बसली होती, तर ऐश्वर्या अमिताभ

बच्चनसोबत बसली होती. अभिषेक बच्चननेही त्याच्या टीम जयपूर पिंक पँथरची मॅच कुटुंबासोबत बसून पाहिली.



# गोलंदाजीच्या जोरावर भारताने मारली बाजी!

## भारतीय गोलंदाज हर्षित राणाने दमदार गोलंदाजी केली

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**कॅनबेरा येथे रविवारी झालेल्या सराव सामन्यात भारताने शानदार विजयाची नोंद केली. टीम इंडियाने पीएम इलेव्हनचा ६ विकेट्सने पराभव केला. भारताकडून शुबमन गिलने दमदार कामगिरी करत अर्धशतक झळकावले. तर वॉशिंग्टन सुंदरने ४२ धावांची स्फोटक खेळी खेळली. हर्षित राणाने अप्रतिम गोलंगादाजी करताना सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी टीम इंडियासाठी हा अप्रतिम विजय होता.**



या सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द करण्यात आला, तर दुसऱ्या दिवसाच्या खेळात दोन्ही संघांनी ४६-४६ षटके खेळण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर हर्षित राणाने भेदक गोलंदाजी करत यजमान संघाला आपल्या पुढे गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियन पीएम इलेव्हन संघ ४३.२ षटकात २४० धावांवरच गारद झाला. या सामन्यात भारतीय संघाच्या गोलंदाजीत हर्षित राणाने अप्रतिम कामगिरी करत एकूण ४ विकेट्स आपल्या नावावर केले.त्याने ६ षटके गोलंदाजी करताना ४४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. यादरम्यान राणाने आपल्या शानदार गोलंदाजीने दोन फलंदाजांना त्रिफळचीत केले. राणाने जॅक क्लेटन, ऑलिव्हर डेव्हिस, जॅक एडवर्ड्स आणि सॅम हार्पर यांना तंबूचा रस्ता दाखवला. यानंतर भारतीय संघ फलंदाजीसाठी उतरला. टीम इंडियाने ४६ षटके फलंदाजी करत ४ विकेट गमावून २५७ धावा केल्या. भारताची धावसंख्या ऑस्ट्रेलियापेक्षा जास्त होती. त्यामुळे टीम इंडियाला या सामन्यात विजयी घोषित करण्यात आले.हर्षित राणा व्यतिरिक्त आकाश दीपलाही दोन दिवसीय सराव सामन्यात गोलंदाजी करण्याची संधी मिळाली, ज्यात त्याने दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय मोहम्म सिराज, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनीही प्रत्येकी एक विकेट्स घेतली.

या सामन्यात रविचंद्रन अश्विनला गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही. अशाप्रकारे हर्षित राणा व्यतिरिक्त आकाश दीपने आपल्या धारदार गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.टीम इंडियाच्या विजयात दोन खेळाडूंनी महत्त्वाची भूमिका बजावली. हे दोन खेळाडू दुसरे कोणी नसून शुबमन गिल आणि हर्षित राणा आहेत. या दोन्ही खेळाडूंनी या सामन्यात अप्रतिम कामगिरी केली. सामन्याच्या पहिल्या डावात हर्षित राणाची गोलंदाजी अप्रतिम होती. सामन्याच्या पहिल्या डावात राणाने ६ षटकांत ४४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. यानंतर शुबमनने धावांचा पाठलाग करताना अर्धशतक झळकावले. या सामन्यात गिलने ६२ चेंडूत ५० धावा केल्या.

दुसरीकडे जैस्वालनेही ४५ धावांची खेळी केली.या सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द करण्यात आला, तर दुसऱ्या दिवसाच्या खेळात दोन्ही संघांनी ४६-४६ षटके खेळण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर हर्षित राणाने भेदक गोलंदाजी करत यजमान संघाला आपल्या पुढे गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियन पीएम इलेव्हन संघ ४३.२ षटकात २४० धावांवरच गारद झाला. या सामन्यात भारतीय संघाच्या गोलंदाजीत हर्षित राणाने अप्रतिम कामगिरी करत एकूण ४ विकेट्स आपल्या नावावर केले.त्याने ६ षटके गोलंदाजी करताना ४४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. यादरम्यान राणाने आपल्या शानदार गोलंदाजीने दोन फलंदाजांना त्रिफळचीत केले. राणाने जॅक क्लेटन, ऑलिव्हर डेव्हिस, जॅक एडवर्ड्स आणि सॅम हार्पर यांना तंबूचा रस्ता दाखवला.

यानंतर भारतीय संघ फलंदाजीसाठी उतरला. टीम इंडियाने ४६ षटके फलंदाजी करत ४ विकेट गमावून २५७ धावा केल्या. भारताची धावसंख्या ऑस्ट्रेलियापेक्षा जास्त होती. त्यामुळे टीम इंडियाला या सामन्यात विजयी घोषित करण्यात आले.हर्षित राणा व्यतिरिक्त आकाश दीपलाही दोन दिवसीय सराव सामन्यात गोलंदाजी करण्याची संधी मिळाली.

### शुबमनने अर्धशतक झळकावले

, ज्यात त्याने दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय मोहम्म सिराज, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनीही प्रत्येकी एक विकेट्स घेतली. या सामन्यात रविचंद्रन अश्विनला गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही. अशाप्रकारे हर्षित राणा व्यतिरिक्त आकाश दीपने आपल्या धारदार गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.टीम इंडियाच्या विजयात दोन खेळाडूंनी महत्त्वाची भूमिका बजावली. हे दोन खेळाडू दुसरे कोणी नसून शुबमन गिल आणि हर्षित राणा आहेत. या दोन्ही खेळाडूंनी या सामन्यात अप्रतिम कामगिरी केली. सामन्याच्या पहिल्या डावात हर्षित राणाची गोलंदाजी अप्रतिम होती. सामन्याच्या पहिल्या डावात राणाने ६ षटकांत ४४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. यानंतर शुबमनने धावांचा पाठलाग करताना अर्धशतक झळकावले.

# रोहित शर्माच्या मुलाचे नाव अहान शर्मा ठेवले!

## पत्नी रितिका सजदेहने इन्स्टा स्टोरी शेअर करत दिली माहिती

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय एकदिवसीय आणि कसोटी संघाचा कर्णधार रोहित शर्मा नुकताच दुसऱ्यांदा बापमाणूस झाला आहे. १५ नोव्हेंबर रोजी रोहितची पत्नी रितिकाने एका गोंडस मुलाला जन्म दिला होता. आता या जोडप्याने आपल्या दुसऱ्या मुलाचे नावही ठेवले आहे. रोहित आणि रितिका यांनी आपल्या मुलाचे नाव 'अहान शर्मा' ठेवले आहे. रोहितची पत्नी रितिका हिने स्वतः तिच्या अधिकृत इंस्टाग्रामवर स्टोरी शेअर करून ही माहिती दिली आहे.**



रोहित आणि रितिकाला एक मुलगी आहे, तिचे नाव समायरा आहे. समायराचा जन्म २०१८ मध्ये ३० डिसेंबर रोजी झाला होता. शनिवारी तिचा सहावा वाढदिवस साजरा करण्यात आला. रोहित आणि रितिका यांचे २०१५ मध्ये लग्न झाले होते. आता आपण या जोडप्याने अहानच नाव का ठेवले? आणि या शब्दाचा अर्थ काय आहे? जाणून घेऊया.

अहान हे नाव संस्कृत शब्द 'अहा' पासून आले आहे. याचा अर्थ 'जागणे' असा होतो. आहान नावाचा अर्थ पहाट, सूर्योदय, प्रकाशाचा पहिला किरण, मॉर्निंग ग्लोरी इ. या नावाची व्यक्ती नेहमी शिकण्याचा आणि पुढे जाण्याचा प्रयत्न करेल.अहानच्या जन्मामुळे रोहित शर्मा ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटीचा भाग होऊ शकला नाही. त्याच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराहने पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत भारताचे नेतृत्व केले. टीम इंडियाने पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा एकतर्फी पराभव केला. यजमानांनी पहिली कसोटी २९५ धावांच्या मोठ्या फरकाने गमावली.

### 'अहान' चा अर्थ काय?

ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारताचा हा सर्वात मोठा कसोटी विजय ठरला. पाच सामन्यांच्या या रोमांचक कसोटी मालिकेत भारत आता १-० ने आघाडीवर आहे. दुसरी कसोटी ॲडलेडमध्ये खेळवली जाईल. दुसरा कसोटी सामना गुलाबी चेंडूने दिवस-रात्र खेळला जाणार आहे. भारताने शेवटचा दिवस-रात्र कसोटी सामना २०२२ मध्ये श्रीलंकेविरुद्ध खेळला होता. दुसऱ्या कसोटीत रोहित शर्मा पुन्हा एकदा टीम इंडियाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.